# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप /केंस क्र.०६/२०१७-१८/२२७ दिनांक : १५-०६-२०१७

**आदेश केस क्र.०६ /१७-१८**

श्री शशीकांत मलगोंडा पाटील
वॉ.क्र. १४ घर क्र. १० संभाजी चौक
इचलकरंजी जि.कोल्हापूर
— **तक्रार अर्जदार (ग्राहक)**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग अ इचलकरंजी
— **विरुध्द पक्षकार**

**कोरमः-**
१.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे - न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) उपरोक्त तक्रारदार यांच्या विरुध्द वि.प. यांचेतर्फे करण्यात आलेली जुनी थकबाकीबाबतची आणि दंड रु.७,०३२/- वसूल केल्याची कारवाई रद्द करण्याबद्दल प्रस्तुतचे गा-हाणे अपिल तक्रारदार यांनी इकडे दाखल केले आहे.

## संक्षिप्त गा-हाणे

२) ग्राहक तक्रारदार - श्री शशीकांत मलगोंडा पाटील रा. वॉर्ड क्र.१४,घर क्र.१० इचलकरंजी यांची घरगुती वीज जोडणी ग्राहक क्र. २५०६४८७०११२४ दिनांक १६-०१-२०१४ पासून त्यांच्या रहात्या घरात चालू आहे. दि. २८-१२-२०१६ रोजी वि.प. यांच्या अधिका-यांनी तक्रारदार यांचे घरी जाऊन अचानक तपासणी करुन दिनांक ३०-१२-२०१६ ची विद्युत कायदा कलम १२६ नुसार रु. ७०३२/- दंड भरण्याची आणि त्यांचे वडील मलगोंडा आण्णा पाटील यांचे नावची रु. ५९,११०/- ची थकबाकी सात दिवसांत भरणेबद्दल नाटीस दिली. तक्रारदार यांचे असे म्हणणे आहे की, ते घरगुती स्वरुपात किराणा दुकानाचा व्यवसाय करीत असून त्यांचा वीज वापर दरमहा ३०० युनिटच्या आत आहे. त्यांना दंड आकारणीची सविस्तर माहिती देणेत आली नाही. त्यांना म्हणणे मांडणेची संधी देणेत आली नाही. त्यांचेवर कलम १२६ प्रमाणे केलेली कारवाई अयोग्य आहे. त्यांनी त्यांची बाजू मांडणेचा प्रयत्न केला असता त्यांना न्याय मिळत नसल्याने त्यांनी शेवटी Under Protest दंडाची रक्कम दि. ०३.०२.२०१७ रोजी वि.प.कडे जमा केली आहे.थकबाकीची मागणी केलेली रक्कम वसूलीस अपात्र आहे. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांच्याकडे दाखल केलेली दिनांक २१.१०.२०१६ रोजीची तक्रार नामंजूर केल्याने त्यांनी हे अपिल या मंचासमोर दिनांक ११.०४.२०१७ रोजी दाखल केले आहे.

## वितरण कंपनीची भूमिका

३) दि.२७-१२-२०१६ रोजी वि.प.यांचे प्रभारी सहाय्यक संचालक यांनी केलेल्या स्थळ तपासणीत, तक्रारदार यांच्या घरगुती वीज पुरवठयाचा वापर व्यापारासाठी होत होता हे दिसून आले. त्यामुळे तक्रारदार यांना कलम १२६ प्रमाणे दंड भरण्याची व कायमपणे खंडीत केलेल्या मलगोंडा आण्णा पाटील यांच्या नावाच्या ग्राहक क्र. २५०६४००६७८७०८ वरील थकबाकी रु. ५९,११०/- भरणेबाबत नोटीस देणेत आली. तक्रारदार यांचा रस्त्याचे लगत दुकानगाळा असून त्यामध्ये किराणा दुकान चालवतात आणि त्यांच्या पिछाडीस तीन मजली इमारतीपैकी तिस-या मजल्यावर तक्रारदार व त्यांचे कुटुंबिय रहातात. उपरोक्त दुकान गाळयामध्ये मलगोंडा पाटील यांचे नावे कायमपणे खंडीत केलेली व्यापारी वीज जोडणी होती. तक्रारदार यांचे रहाण्याचे घर व सदर दुकानगाळा या स्वतंत्र जागे आहेत. तक्रारदार यांनी दंडाची रक्कम कोणतीही हरकत न घेता भरलेली आहे. ग्राहक क्र. २५०६४००६७८७०८ ची वीज जोडणी मार्च-२००५ मध्ये थकबाकीपोटी कायम स्वरुपी बंद केली होती. तक्रारदार यांच्यावर करण्यात आलेली कारवाई योग्य व बरोबर आहे असे वि.प. यांचे म्हणणे आहे.

४) या प्रकरणाची सुनावणी दि. ०९-०६-२०१७ रोजी या मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्री विनोद कांबळे आणि वि.प.तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री प्रितम काळे, हजर होते. त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध सर्व कागदपत्रे वाचण्यात आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांचेकडून दिनांक २९-१२-२०१६ च्या नोटीसी प्रमाणे मागणी केलेली ग्राहक क्र. २५०६४००६७८७०८ यावरील थकबाकली विद्युत कायदा २००३ कलम ९६ प्रमाणे आता वसूलीस पात्र आहे काय?

उत्तरः- नाही.

२) तक्रारदार यांचे विरुध्द , सदर कायद्याच्या कलम १२६ प्रमाणे केलेल्या कारवाईमध्ये या मंचास हस्तक्षेप करता येईल काय?

उत्तरः- नाही.

३) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

६) तक्रारदार हे इचलकरंजी येथील वॉर्ड क्र.१४ मधील घर क्र.१० या तीन मजली इमारतीमध्ये तिस-या मजल्यावर रहातात असे स्पष्ट दिसून येते तक्रारदार यांचे वडील मलगोंडा आण्णा पाटील हे अंदाजे एक महिन्यापूर्वी मरण पावले आहेत असे श्री विनोद कांबळे यांनी सांगितले. तक्रारदार यांच्या दुकानाचे फोटो वि.प. यांनी दाखल केले आहेत. त्यावरुन असे दिसते की, तक्रारदार हे चालवत असलेला किराणा दुकानाचा व्यवसाय ज्या दुकानगाळात आहे. तो दुकानगाळा रस्त्यालगत जुन्या इमारतीत असून त्यामागे असलेल्या आरसीसी इमारती मधील तिस-या मजल्यावर तक्रारदार हे त्यांच्या कुटुंबासोबत रहात आहेत.

७) तक्रारदार यांच्या सदर रहात्या घरासाठी ग्राहक क्र. २५०६४८७०११२४ ची घरगुती वीज जोडणी जानेवारी २०१४ पासून चालू आहे. तक्रारदार सध्या जेथे किराणा दुकान चालवितात तेथे पूर्वी मलगोंडा पाटील यांचे नावे ग्राहक क्र. २५०६४००६८७०८ ची व्यापारी वीज जोडणी होती आणि ती मार्च २००५ मध्ये थकबाकीपोटी कायम स्वरुपी खंडीत करण्यात आली होती. तक्रारदार यांच्या सदर दुकान गाळयात स्वतंत्र वीज मिटर व वीज कनेक्शन नसल्याचे दिसून येते.

८) मार्च २००५ मध्ये मलगोंडा पाटील यांच्या नावचे दुकान गाळयातील वीज कनेक्शन कायमपणे बंद केल्यानंतर वि.प. तर्फे थकबाकी वसूलीसाठी कोणतीही कारवाई केलेचे दिसून येत नाही. थकबाकी वसूलीसाठी मलगोंडा पाटील यांचे विरुध्द योग्य त्या न्यायालयात दावा दाखल केली नाही. विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६(२) प्रमाणे कथित थकबाकी अव्याहतपणे व सातत्याने देयकांमध्ये दर्शविली असल्याचा पुरावा नाही. दाखल केलेला CPL उतारा जानेवारी २००५ पर्यन्तचा आहे. त्यामुळे सदरची तथाकथित थकबाकी मुदतबाहय झाल्यामुळे वसुली अपात्र आहे हे स्पष्ट होत. याबाबतीत श्री प्रितम काळे यांच्या युक्तिवादाशी आम्ही सहमत होऊ शकत नाही.

९) दि. २८-१२-२०१६ रोजी कोल्हापूर परिमंडलाचे प्रभारी सहाय्यक संचालक (सुंरक्षा व अंमलबजावणी) यांना जेव्हा तक्रारदाराच्या संबंधीत जागेची स्थळ तपासणी केली तेव्हा तक्रारदार यांच्या दुकानागाळयात त्यांच्या घरगुती वीज जोडणीतून वीज पुरवठा चालू असल्याचे दिसून आले. त्यांच्या तपासणी अहवालाची प्रत दाखल आहे. वरील वस्तुस्थितीबाबत उभय पक्षात वाद नाही. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे की, ते छोटे व्यावसायिक असून घरगुती स्वरुपात किराणा दुकानचा व्यवसाय करतात. तसेच त्यांचा मासिक वीज वापर ३०० युनिटच्या आत आहे.

१०) वि.प. यांचे वाणिज्य परिपत्रक क्र.१७५ मध्ये "For Residential Consumers who run small businesses from their household. . .." असे नमूद आहे. वि.प. यांचे वाणिज्य परिपत्रक क्र. २४३ मध्ये याबाबतीत "The LT Residential Tariff shall also be applicable to the Consumers undertaking business or other commercial . . . . activities from a part of their residence , subject to . . . ." असे स्पष्टपणे नमूद केले आहे. (अंडरलाईनिंग आम्ही केले आहे.) म्हणजेच, ज्या घरात ग्राहक रहातो त्याच घरातील एखाद्या भागात तो व्यवसाय करीत असला पाहिजे अशी शर्त आहे.

११) या प्रकरणात, तक्रारदार हे कुटुंबियांसह पिच्छाडीच्या आरसीसी इमारतीत तिस-या मजल्यावर रहातात, तर त्यांचे किराणा दुकान रस्त्यालगतचे (जुन्या) इमारतीत तळ मजल्यावर चालू आहे. त्यामुळे तक्रारदार यांना वर परिच्छेद १० मध्ये नमूद केलेल्या टेरिफचा लाभ देता येत नाही असे आम्हास वाटते. म्हणजेच तक्रारदार हे उपरोक्त दुकानगाळयात अनधिकृतपणे वीजेचा वापर करीत होते. त्यामुळे विद्युत कायदा २००३ चे कलम १२६ सकृतदर्शनी लागू होते असे आमचे मत आहे.

१२) एकदा, वि.प. तर्फे तक्रारदार यांचे विरुध्द झालेली कारवाई कलम १२६ खाली येते हे निश्चित झाल्यानंतर, ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील नियम ६.८ यानुसार या मंचास अधिकारक्षेत्र रहात नाही. तक्रारदारतर्फे प्रतिनिधी यांनी युक्तिवाद केला की कलम १२६ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीचे आणि मा. विद्युत नियामक आयोगाने केलेल्या नियमांचे वि.प. यानी पालन केले नव्हते. तसेच स्थळ तपासणी अहवाल, लॉगबुक वगैरे कागदपत्रांच्या प्रती दिल्या नाहीत, Perovisional Assessment,. नोटीस देणे, Final Assessment वगैरे पूर्तता केली नाही. जर वि.प. यांनी सदर बाबींची पूर्तता योग्यरित्या कायद्यानुसार व नियमाप्रमाणे केली नसेल तरीही त्या त्रुटी Errors within Jurisdiction या कक्षेत येतात. जेव्हा अशा चूका/त्रुटी Errors without Jurisdiction च्या कक्षेत येतात. तेव्हा मंच किंवा न्यायालय त्यामध्ये हस्तक्षेप करु शकते. कलम १२६ च्या कारवाईबाबत कलम १२७ मध्ये अपिल करण्याची तरतूद आहे, हे येथे नमूद करणेत येते. त्यामुळे Error within Jurisdiction च्या बाबतीत मंचास हस्तक्षेप करता येणार नाही असे आम्हास वाटते.

१३) उपरोक्त कारणांस्तव तक्रारदार यांचे विरुध्द वि.प. यांनी दिलेली कलम १२६ प्रमाणे दंड रु. ७,०३२/- भरणे बद्दलची दिनांक २९-१२-२०१६ ची नोटीस रद्द करता येत नाही.

१४) वर नमूद केलेल्या परिस्थितीत , प्रस्तुत अपिल अंशतः मंजूर होणेस पात्र आहे. शेवटी खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

**आदेश**

१) तक्रारदार श्री शशीकांत मलगोंडा पाटील यांचे सदरचे गा-हाणे अपिल खालील प्रमाणे अंशतः मंजूर करणेत येत आहे.
२) श्री मलगोंडा आण्णा पाटील रा. इचलकरंजी (तक्रारदार यांचे मयत वडील) यांचे नावे असलेली ग्राहक क्र. २५०६४००६७८७०८ या मार्च २००५ मध्ये कायमपणे खंडीत केलेल्या वीज जोडणी वरील तथाकथित थकबाकी मुदतबाहय झाल्याने वसूलीस पात्र नाही असे जाहिर करण्यात येत आहे.
३) सदर तक्रारदार यांचे विरुध्द वि.प. यांचेतर्फे दिनांक २९-१२-२०१६ (जा.क्र. ५४२८) ची विद्युत कायदा २००३ कलम १२६ प्रमाणे दंड रु. ७०३२/- भरणेची दिलेली नोटीस रद्द करण्याची विनंती नामंजूर करण्यात येते.
४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |